**छान वाटतंय अशात...**

सगळी सुखं हाताशी नाही आली,

किंवा सगळी स्वप्नंही पूर्ण नाही झाली,

पण चाहूल आहे एक नवी मनात,

आणि मन रमतंय आताशा त्यात... हो,

छान वाटतंय अशात !

नेहमीचेच प्रश्नं, न सुटणारी कोडी आहेत,

भरमसाठ व्याप, आणि शांतता थोडी आहे..

पण हसू आहे एक ओठांत,

आणि नवे बळ शरीरात.. खरंच हो,

छान वाटतंय अशात !

भीती पण वाटते कधी, नाही असे नाही

मनात दाटते शंका, येते काही-बाही,

पण विरून जाते ते क्षणांत,

आणि चांदणे पडते उन्हात...नक्की हो,

छान वाटतंय अशात !

छानच वाटतंय अशात :)

**- प्रीती देशपांडे**

**http://www.meetipreeti.com/**